कोल्हापूर महानगरपालिका

रचना व कार्यपध्दती कार्यालय

जाहीर प्रसिध्दीकरण

कोल्हापूर महानगरपालिकेच्या कायम आस्थापनावरील वर्ग ०१ ते ०४ अ,ब,क,ड संवर्गातील अधिकारी/कर्मचां-यांची विभागीय खातेनिहाय चौकशी करणेसाठी चौकशी अधिका-यांची नियुक्ती करणेत येणार आहे.यासाठी अधिकारी शासन सेवेतून गट-अ किंवा गट-ब (राजपत्रित पदावरुन) निवृत्त झालेले व वय वर्षे जाहीर प्रसिध्दीकरण झालेल्या दिनांकास ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.इच्छुक शासन सेवेतून सेवानिवत्त अधिका-यांकडून या पदासाठी अर्ज मागविणेत येत आहेत.अटी व शर्ती महानगरपालिकेच्या web.kolhapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

अर्ज स्विकारणेची तारीख व वेळः-दि.०४/०३/२०२६ ते दिनांक १३/०४/२०२६ अखेर

सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यत (कार्यालयीन सुट्टीचा दिवस वगळून)

ठिकाणः- ब्युरो ऑफिस, कोल्हापूर महानगरपालिका मेन बिल्डींग,

(सही/-)

अति. आयुक्त क्रं.०२

कोल्हापूर महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग विचौअ-१६२५/प्र.क्र.०५/विचै-२ दिनांक १३ मार्च,२०२५ शासन निर्णयानुसार कोल्हापूर महानगरपालिकेच्या कायम आस्थापनावरील गट अ, ब, क, ड संवंर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी अटी व शर्ती .**

## अटी

१) अधिकारी शासन सेवेतून गट-अ किंवा गट-ब (राजपत्रित पदावरुन) निवृत्त झालेले असावेत.

२) सेवानिवृत्तीच्या दिनांकास सहाव्या वेतन आयोगानुसार कमाल ग्रेड वेतन ५४०० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार कमाल वेतनस्तर एस-२० असावा.

३) सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त होताना/झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायीक कार्यवाही झालेली नसावी.

४) शारीरिक, मानसिक आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावेत.(जिल्हा शल्य चिकित्सक) यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

५) चौकशीच्या कामात व्यत्यय येईल अशा इतर सेवेत/व्यवसायात गुंतलेले नसावेत.

६) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**शर्ती** .

१) नियुक्त होणा-या अधिका-याची नियुक्ती प्रथमतः ३ वर्षाकरीता राहील.

२) दर ३ वर्षानी चौकशी अधिकारी यांच्या कामाचा आढावा घेऊन नियुक्ती पुढील ३ वर्षानी चालू ठेवण्यात येईल.

३) जास्तीत जास्त वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यत चालू राहील

४) एका चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी याना शासन नियमानुसार अथवा आयुक्त/प्रशासकसो ठरवतील त्याप्रमाणे ठोक रक्कम मंजूर करणेत येईल.

५) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत मानधन अदा करण्यात येईल.

सदोष चौकशीचा अहवाल मा.प्रशासकसो/आयुक्तसो यांच्या छाननीअंती निर्दशनास आलेस मानधन देय होणार नाही.

६) वयाची ७० वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपली नियुक्ती कमी झाल्याचे मानण्यात येईल यासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित केले जाणार नाहीत कार्यकाळ पूर्ण केल्यास चौकशी प्रकरणे स्विकारता येणार नाहीत.

७) वयाची ७० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी ६ महिन्यांच्या कालावधीत चौकशी नविन प्रकरणे स्विकारता येणार नाहीत.

८) चौकशी अधिका-यास एकावेळी १२ प्रकरणे हाताळण्याची मुभा राहिल. चौकशी सुरु असलेल्या प्रकरणांचा त्रैमासिक अहवाल आयुक्त/प्रशासाकसो यांचेकडे न चूकता सादर करावा एकही प्रकरण प्राप्त नसेल तरी निरंक अहवाल सादर करावा.

९) चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यानंतर सोपविण्यात आलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी सदर चौकशी प्रकरणामध्ये त्यांचा कोणत्याही प्रकारे अपचारी वा प्रकरणाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आलेला नाही व त्या चौकशी प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नाहीत, तसे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

१०) चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त झाल्यानंतर चौकशी प्रकरणासंदर्भात प्राप्त होणा-या/माहिती/आधार सामग्रीबाबत गोपनीयता बाळगावी त्याचा वापर केवळ त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसाठीच करावा.

११) चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त झाल्यानंतर चौकशीचे कामकाज चालू असताना किंवा चौकशी अहवाल सादर केल्यानंतर अशी कोणतीही कागदपत्रे/माहिती किंवा आधार सामग्री उघड करता कामा नये. चौकशी अधिका-याने सोपविलेल्या चौकशी प्रकरणाच्या सर्व नोंदी/कागदपत्रे/कामकाज इ.बाबत गुप्तता व गोपनीयता बाळगावी.

१२) चौकशीचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर चौकशीचा अहवाल मा.प्रशासकासो/आयुक्तसो यांचेकडे सोपविताना चौकशीचे कामकाजातील सर्व नोंदी, संबंधित दस्तावेज अहवालासोबत देण्याचा आहे.

१३) आयुक्तसो/प्रशासकासो यांना चौकशीच्या कामकाजाच्या कोणत्याही वेळी,कोणतेही कारण न देता आणि कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल

१४) शासन परिपत्रक,सा.प्र.वि.दिनांक ०६/११/२०२४ मधील सूचनांनुसार प्रकरण स्विकारल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत चौकशीचे कमकाज पूर्ण करुन आपला चौकशीचा अहवाल आयुक्त/प्रशासकसो यांचेकडे सादर करण्याचा आहे.

१५)अपवादात्मक प्रकरणी योग्य ती कारणमिमांसा नमूद करुन आयुक्तसो/प्रशासकसो यांचेकडून तीन महिन्यांची मुदतवाढ घेता येईल.

१६) चौकशी प्रकरणांचा प्राथम्यक्रम, न्यायालयीन प्रकरणे, सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची प्रकरणे १ वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणा-या व सर्वसाधारण प्रकरणे असा ठेवून त्यानुसार प्रकरणे निकाली काढण्याची आहेत.

(सही/-)
अतिरीक्त आयुक्त क्र.(०२)
कोल्हापूर महानगरपालिका